२३-०९-२००३ म्हसोबा हिटणी येथील जवान वरुण पाटील श्रीनगरमध्ये शहीद

निपाणी (प्रतिनिधी) : येथून ९ कि.मी. अंतरावर असणाऱ्या म्हसोबा हिटणी (ता. हुक्केरी) या गावचा जवान वरुण मनोहर पाटील (वय २०) शनिवार दि. २० रोजी पूंछ गुडसोई श्रीनगर येथे अतिरेक्यांशी झालेल्या धुमश्चक्रीत शहीद झाला. शहीद जवान वरुण पाटीलच्या या वीरमरण वृत्ताने म्हसोबा हिटणीसह या परिसरावर शोककळा पसरली आहे. शहीद जवान वरुण पाटील हा आईवडिलाना एकुलता एक मुलगा असून देवचंद कॉलेज अर्जुननगर येथे त्याचे महाविद्यालयीन शिक्षण झाले. लष्करात भरती झाल्यावर बेळगाव येथे प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर त्याची पोस्टिंग काश्मीरमध्ये झाली होती. शनिवार दि. २० रोजी श्रीनगर विभागात अतिरेक्यांशी झालेल्या चकमकीत त्याला वीरमरण प्राप्त झाले. शहीद जवान वरुण पाटील याचे पार्थिव काश्मीरहून नवी दिल्ली तेथून पुणे-निपाणीमार्गे म्हसोबा हिटणी येथे आणण्यात येणार असून तेथे त्याच्या पार्थिवावर लष्करी इतमामाने मंगळवार दि. २३ रोजी अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. शहीद जवान वरुण पाटील यांच्या पश्चात आई-वडील व दोन बहिणी असा परिवार आहे.

२३-०९-२००३ म्हसोबा हिटणी येथील शहीद जवानावर आज अंत्यसंस्कार

संकेश्वर -

श्रीनगरमधील दोडा जिल्ह्यातील गुर्किकर येथे भारतीय सैनिक छावणीवर पाकिस्तानी सैन्याने केलेल्या बॉम्ब हल्ल्यात म्हसोबा हिटणी ता. हुक्केरी येथील जवान वरुण मनोहर पाटील वय २० हा शहीद झाला. हा हल्ला दि. २१ रोजी पहाटे तीन वाजता झाला. वरुणचे पार्थिव दि. २३ रोजी सकाळी सात वाजता गावात आणण्यात येणार असून हिंदू स्मशानभूमीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.वरुण अविवाहीत असून तो गेल्याच वर्षी गुर्किकर येथे दाखल झाला होता.

२४-०९-२००३ शहीद वरुण पाटील यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार

निपाणी (मनोहर बन्ने) : उरी सेक्टर काश्मीर येथील भारत-पाक सीमेवर पाकिस्तानी अतिरेक्यांनी भारतात घुसखोरी करता यावी यासाठी पाकिस्तानी सैनिकांनी केलेल्या कव्हरिंग फायरच्या वेळी झालेल्या चकमकीत रविवारी पहाटे शहीद झालेले म्हसोबा हिटणी (ता. हुक्केरी) येथील जवान वरुण मनोहर पाटील यांच्या पार्थिवावर आज दुपारी दीड वाजता सुमारे दहा हजारांहून अधिक शोकाकुल नागरिकांच्या उपस्थितीत लष्करी इतमामाने विधिवत अंत्यसंस्कार करण्यात आले. मराठा लाईट इन्फंट्रीचे कॅप्टन एस. बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखाली आलेल्या जवानांच्या तुकडीने यावेळी बिगुलावर शोकधून वाजवून व हवेत गोळीबाराच्या फैरी झाडून शहीद जवान वरुण पाटील यांना मानवंदना दिली.

रविवार दि. २१ सप्टेंबरच्या पहाटे सव्वाचारच्या सुमारास झालेल्या चकमकीत शहीद झालेले जवान वरुण पाटील (वय २०) यांचा तिरंग्यात वेष्टित केलेला शवपेटीतील पार्थिव घेऊन गडहिंग्लजचे जवान जोतिबा पाटील हे काल विमानाने काश्मीरहून दिल्लीमार्गे पुण्यास लोहगाव विमानतळावर आले. तेथून काल सायंकाळी ७ वा. ॲम्ब्युलन्सने त्यांचे पार्थिव सातारा, कराड, कोल्हापूर, निपाणीमार्गे म्हसोबा हिटणीस आणण्यात आले. आज सकाळी ७.३० वाजता निपाणीत पुढारी परिवारातर्फे मनोहर बन्ने, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानतर्फे राजेंद्र वंकुंगळे, पर्यावरण संघटनेतर्फे फिरोज चाऊस, तरुण मंडळांच्या वतीने महादेव बन्ने तसेच संग्राम मुळीक, रवींद्र घोडके, विनायक वडे व अन्य नागरिकांनी पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. सकाळी ठीक साडेआठ वाजता शहीद वरुण पाटील यांच्या पार्थिवाचे म्हसोबा हिटणीत आगमन झाले.

त्यावेळी म्हसोबा हिटणी व परिसरातून जमलेल्या हजारो आबालवृद्ध नागरिकांनी शहीद जवान वरुण पाटील अमर रहेच्या घोषणा दिल्या. त्यानंतर सजविलेल्या ट्रॅक्टर ट्रॉलीवरून त्यांच्या पार्थिवाची गावातून प्रचंड अंत्ययात्रा निघाली. मार्गात ठिकठिकाणी माता-भगिनींनी पाणी घालून व पंचारतीने ओवाळून आपल्या शहीद ग्रामपुत्राचे साश्रूनयनांनी दर्शन घेतले तर आपापले सर्व दैनंदिन व्यवहार बंद ठेवून समस्त ग्रामस्थांनी आपला शोक व्यक्त केला. ही अंत्ययात्रा शहीद वरुण पाटील यांच्या घराजवळ आल्यावर आईवडिलांना एकुलता एक असणाऱ्या वरुणचे पार्थिव घरासमोर ट्रॉलीमधून जवानांनी खाली उतरवले. यावेळी वरुणचे वडील मनोहर, आई सुनिता, बहिणी प्रियांका व अमृता, काका सुनील आणि अनिल यांनी दुःखावेगाने फोडलेले हंबरडे व त्यांनी केलेला आक्रोश पाहून ओवाळून आपल्या शहीद ग्रामपुत्राचे साश्रूनयनांनी दर्शन घेतले तर आपापले सर्व दैनंदिन व्यवहार बंद ठेवून समस्त ग्रामस्थांनी आपला शोक व्यक्त केला.
ही अंत्ययात्रा शहीद वरुण पाटील यांच्या घराजवळ आल्यावर आईवडिलांना एकुलता एक असणाऱ्या वरुणचे पार्थिव घरासमोर ट्रॉलीमधून जवानांनी खाली उतरवले. यावेळी वरुणचे वडील मनोहर, आई सुनिता, बहिणी प्रियांका व अमृता, काका सुनील आणि अनिल यांनी दुःखावेगाने फोडलेले हंबरडे व त्यांनी केलेला आक्रोश पाहून सर्वांचीच मने हेलावली. या कुटुंबियांचे सांत्वन करायला शब्दच नव्हते. या अंत्ययात्रेत वृद्ध, अपंग, विद्यार्थी, स्त्री-पुरुष असा सुमारे दहा हजारांहून अधिक जनसमुदाय सहभागी झाला होता.
सकाळी ८.३० वा. सुरू झालेली ही अंत्ययात्रा दुपारी एक वाजता स्मशानभूमीत पोहोचली. यावेळी लष्करी जवानांनी व पोलिसांनी मेठा बंदोबस्त ठेवला होता. हजारो स्त्री-पुरुषांनी यावेळी शहीद वरुणचे साश्रूनयनांनी दर्शन घेतले तर प्रियांका व अमृता या दोघी बहिणींनी आम्हाला भावाला शेवटचे ओवाळू द्या, असे म्हणत आरतीने ओवाळणी केली तेव्हा जनसमुदायाला अश्रू आवरता आले नाहीत. शहीद जवान वरुण अविवाहित असल्याने जरूर ते शास्त्रोक्त विधी त्यांचे वडील मनोहर यांनी केल्यानंतर त्यांचे चुलते अनिल व सुनील यांनी वरुणच्या चितेस मंत्राग्नी दिला. यावेळी लष्करी जवानांनी सशस्त्र सलामी दिली. तसेच पोलिसांनीही सलामी दिली. यावेळी शहीद जवान वरुण पाटील अमर रहेच्या गगनभेदी घोषणा देण्यात आल्या. तसेच यावेळी संकेश्वरचे आमदार ए. बी. पाटील, माजी मंत्री मल्हारगौडा पाटील, तहसीलदार व्ही. बी. धामन्नावर, मंडल पोलिस निरीक्षक एच. एन. अमरापूर, फौजदार सदाशिव कट्टीमनी, के. जी. पाटील, कॅप्टन एस. बॅनर्जी व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी पुष्पचक्रे अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.

२४-०९-२००३ शहीद वरुण पाटीलवर अंत्यसंस्कार



संकेश्वर - श्रीनगरमधील दोडा जिल्ह्यातील गुर्किकर येथे भारतीय सैनिक छावणीवर पाकिस्तानी सैन्याने केलेल्या हल्ल्यात शहीद झालेल्या वरुण मनोहर पाटील वय २० वर दि. २३ रोजी म्हसोबा हिटणी येथे शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. सकाळी आठ वाजता वरुणचे पार्थिव गावात आणण्यात आले. तहसीलदार व्ही.बी. ामन्नावर यांनी पार्थिव ताब्यात घेवून सलामी दिली. मराठा लाईट इन्फन्ट्रीचे कॅप्टन बॅनर्जी यांनी सलामी दिल्यानंतर शहीद

वरुणच्या अंत्ययात्रेस शोकाकूल वातावरणात सुरूवात झाली. गावातील प्रमुख मार्गावरून ही अंत्ययात्रा वरुणच्या घरी पोहोचली. शहीद झालेल्या आपल्या मुलाचे पार्थिव पाहताच त्याच्या आई, वडील व बहिणींनी हंबरडा फोडला .अंत्ययात्रा स्मशानभूमीत पोहोचल्यानंतर कॅप्टन बॅनर्जी, सुभेदार मनोहर देसाई यांच्या नेतृत्त्वाखाली मराठा लाईट इन्फन्ट्रीच्या ४० जवानांनी बंदूकीच्या फैरी झाडून शहीद जवानास मानवंदना दिली. दुपारी दीडच्या सुमारास शहीद वरुण यास अग्नी देण्यात आला.

शिवराम हिरेकोडी

कणगले -

करजगा ता. हुक्केरी येथील प्रतिष्ठित नागरिक शिवराम भीमराव हिरेकोडी वय ७० यांचे सोमवार दि. २२ रोजी ह्रुदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. महेश्वर हिरेकोडी यांचे ते वडील होते.

## २५-०९-२००३ शहीद वरुण पाटील यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार




निपाणी (मनोहर बन्ने) : उरी सेक्टर काश्मीर येथील भारत-पाक सीमेवर पाकिस्तानी अतिरेक्यांनी भारतात घुसखोरी करता यावी यासाठी पाकिस्तानी सैनिकांनी केलेल्या कव्हरिंग फायरच्या वेळी झालेल्या चकमकीत रविवारी पहाटे शहीद झालेले म्हसोबा हिटणी (ता. हुक्केरी) येथील जवान वरुण मनोहर पाटील यांच्या पार्थिवावर आज दुपारी दीड वाजता सुमारे दहा हजारांहून अधिक शोकाकुल नागरिकांच्या उपस्थितीत लष्करी इतमामाने विधिवत अंत्यसंस्कार करण्यात आले. मराठा लाईट इन्फंट्रीचे कॅप्टन एस. बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखाली आलेल्या जवानांच्या तुकडीने यावेळी बिगुलावर शोकधून वाजवून व हवेत गोळीबाराच्या फैरी झाडून शहीद जवान वरुण पाटील यांना मानवंदना दिली.

रविवार दि. २१ सप्टेंबरच्या पहाटे सव्वाचारच्या सुमारास झालेल्या चकमकीत शहीद झालेले जवान वरुण पाटील (वय २०) यांचा तिरंग्यात वेष्टित केलेला शवपेटीतील पार्थिव घेऊन गडहिंग्लजचे जवान जोतिबा पाटील हे काल विमानाने काश्मीरहून दिल्लीमार्गे पुण्यास लोहगाव विमानतळावर आले. तेथून काल सायंकाळी ७ वा. ॲम्ब्युलन्सने त्यांचे पार्थिव सातारा, कराड ,कोल्हापूर, निपाणीमार्गे म्हसोबा हिटणीस आणण्यात आले. आज सकाळी ७.३० वाजता निपाणीत पुढारी परिवारातर्फे मनोहर बन्ने, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानतर्फे राजेंद्र कंगळे, पर्यावरण संघटनेतर्फे फिरोज चाऊस, तरुण मंडळांच्या वतीने महादेव बन्ने तसेच संग्राम मुळीक, रवींद्र घोडके, विनायक वडे व अन्य नागरिकांनी पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.

सकाळी ठीक साडेआठ वाजता शहीद वरुण पाटील यांच्या पार्थिवाचे म्हसोबा हिटणीत आगमन झाले. त्यावेळी म्हसोबा हिटणी व परिसरातून जमलेल्या हजारो आबालवृद्ध नागरिकांनी शहीद जवान वरुण पाटील अमर रहेच्या घोषणा दिल्या. त्यानंतर सजविलेल्या ट्रॅक्टर ट्रॉलीवरून त्यांच्या पार्थिवाची गावातून प्रचंड अंत्ययात्रा निघाली. मार्गात ठिकठिकाणी माता-भगिनींनी पाणी घालून व पंचारतीने ओवाळून आपल्या शहीद ग्रामपुत्राचे साश्रूनयनांनी दर्शन घेतले तर आपापले सर्व दैनंदिन व्यवहार बंद ठेवून समस्त ग्रामस्थीं आपला शोक व्यक्त केला. ही अंत्ययात्रा शहीद वरुण पाटील यांच्या घराजवळ आल्यावर आईवडिलांना एकुलता एक असणाऱ्या वरुणचे पार्थिव घरासमोर ट्रॉलीमधून जवानांनी खाली उतरवले. यावेळी वरुणचे वडील मनोहर, आई सुनिता, बहिणी प्रियांका व अमृता, काका सुनील आणि अनिल यांनी दुःखावेगाने फोडलेले हंबरडे व त्यांनी केलेला आक्रोश पाहून ओवाळून आपल्या शहीद ग्रामपुत्राचे साश्रूनयनांनी दर्शन घेतले तर आपापले सर्व दैनंदिन व्यवहार बंद ठेवून समस्त ग्रामस्थांनी आपला शोक व्यक्त केला.

ही अंत्ययात्रा शहीद वरुण पाटील यांच्या घराजवळ आल्यावर आई-वडिलांना एकुलता एक असणाऱ्या वरुणचे पार्थिव घरासमोर ट्रॉलीमधून जवानांनी खाली उतरवले. यावेळी वरुणचे वडील मनोहर, आई सुनिता, बहिणी प्रियांका व अमृता, काका सुनील आणि अनिल यांनी दुःखावेगाने फोडलेले हंबरडे व त्यांनी केलेला आक्रोश पाहून सर्वांचीच मने हेलावली. या कुटुंबियांचे सांत्वन करायला शब्दच नव्हते. या अंत्ययात्रेत वृद्ध, अपंग, विद्यार्थी, स्त्री-पुरुष असा सुमारे दहा हजारांहून अधिक जनसमुदाय सहभागी झाला होता.

सकाळी ८.३० वा. सुरू झालेली ही अंत्ययात्रा दुपारी एक वाजता स्मशानभूमीत पोहोचली. यावेळी लष्करी जवानांनी व पोलिसांनी मोठा बंदोबस्त ठेवला होता. हजारो स्त्रीपुरुषांनी यावेळी शहीद वरुणचे साश्रूनयनांनी दर्शन घेतले तर प्रियांका व अमृता या दोघी बहिणींनी आम्हाला भावाला शेवटचे ओवाळू द्या, असे म्हणत आरतीने ओवाळणी केली तेव्हा जनसमुदायाला अश्रू आवरता आले नाहीत. शहीद जवान वरुण अविवाहित असल्याने जरूर ते शास्त्रोक्त विधी त्यांचे वडील मनोहर यांनी केल्यानंतर त्यांचे चुलते अनिल व सुनील यांनी वरुणच्या चितेस मंत्राग्नी दिला. यावेळी लष्करी जवानांनी सशस्त्र सलामी दिली. तसेच पोलिसांनीही सलामी दिली. यावेळी शहीद जवान वरुण पाटील अमर रहेच्या गगनभेदी घोषणा देण्यात आल्या. तसेच यावेळी संकेश्वरचे आमदार ए. बी. पाटील, माजी मंत्री मल्हारगौडा पाटील, तहसीलदार व्ही. बी. धामन्नावर, मंडल पोलिस निरीक्षक एच. एन. अमरापूर, फौजदार सदाशिव कट्टीमनी, के. जी. पाटील, कॅप्टन एस. बॅनर्जी व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी पुष्पचक्रे अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.